लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा,
अनंत कानेकर मार्ग, वांद्रे – पूर्व , मुंबई – ४०० ०५१

दरपत्रक सुचना

दिनांक : २० नोव्हेंबर, २०२६

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा मुंबई येथे महाराष्ट्र ज्युडीशियल ॲकॅडमी ॲन्ड इंडीयन मेडीएशन सेंटर ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अंतर्गत ECT-7-2026 ई–कोर्ट प्रोग्राम अंतर्गत २०२६–२७ साठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेसाठी संगणकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी जाहीर दरपत्रके सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१.	इच्छुक संस्था/कंपन्यानी आपले दरपत्रक विहित नमुन्यात व वस्तुंच्या पुर्ण माहितीसह मोहोरबंद लखोटयात सादर करून त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"संगणकीय उपकरणे खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहून ते 'अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे – पूर्व ४०००५१' यांच्याकडे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत सकाळी ११.३० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावे. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२.	सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम–२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क रूपये २०००/– (विना परतावा) व सुरक्षा ठेव रक्कम रूपये १००००/– (परतावा योग्य व्याजरहीत) या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर देणे गरजेचे आहे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर हे ''प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई" यांच्या नावे दयावयाचा आहे.
३.	दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतांना प्रत्येकी एका नगाची सर्व करांसहीत (With G.S.T.) रक्कम नमूद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमूद करावी.
४.	समितीच्या बैठकीत दरपत्रके उघडण्याच्या वेळेस दरपत्रक धारकांनी आपल्या दरपत्रकात नमुद केलेल्या वस्तुंचे नमुना वस्तु (Sample Piece) पडताळणीसाठी कार्यालयात घेऊन येणे बंधनकारक राहील.

५.	दरपत्रकधारकारने दरपत्रकावर संस्था/कंपनीचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.
६.	दरपत्रकधारकांची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरपत्रकातील दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच खरेदी होईल आणि निवड झाल्यानंतर संगणकीय उपकरणाचा पुरवठा त्वरीत झाला पाहिजे, योग्य वेळेत उपकरणांचा पुरवठा न झाल्यास सदर निवड झालेल्या संस्था/कंपनीला रद्द करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या संस्था/कंपनीकडून खरेदी केलेली उपकरणे पुरवठा झाल्यावर सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करून सुरक्षा ठेव रक्कम १० दिवसानंतर परत करण्यात येईल.
७.	संगणकीय उपकरणाची गुणवत्ता आणि किंमती पडताळणीचे पूर्ण अधिकार खरेदी समितीला राहतील. संगणकीय उपकरणांची किंमत कमी असेल परंतू गुणवत्ता चांगली नसल्यास सदर उपकरणे नाकारण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील.
८.	संगणकीय उपकरणे स्वीकार करतांना जर उपकरणात काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा उपकरणांचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, ती उपकरणे परत देण्यात येतील व त्याऐवजी उत्तम दर्जाची नवीन उपकरणे पुरवठादारास देणे बंधनकारक राहिल.
९.	दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश (Cancelled Cheque) तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकीत प्रत देणे अनिवार्य आहे.
१०.	दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेने सदरच्या उपयोगी संगणकीय उपकरणे या न्यायालयातील मुख्य कार्यालयात येथे विना वाहतूक शुल्क पोच करावयाचे आहे.
११.	मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

20/11/2026

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
मुंबई – २० नोव्हेबर, २०२६ }

(अतुल ग. राणे)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई

ECT-7-2026 , ई—कोर्ट प्रोग्राम अंतर्गत २०२६—२७ अंतर्गत खरेदी करण्यात येणा—या खालील संगणक उपकरणाचे दर प्रत्येक नगानुसार जीएसटीसह भरुन दरपत्रकधारकांनी आपली दरपत्रक सादर करावीत.

TECHNICAL SPECIFICATIONS

Bidders must confirm their compliance with the following specifications:

1) Online UPS 2KVA with Battries and Stand including installation- (Reputed Branded)

Feature	Online UPS Minimum Specifiation Required
Capacity	2 KVA Online UPS (True Double Conversion)
Technology	True Online Double Conversion (IGBT based)
Input Phase	Single Phase (160V – 280V AC)
Output Phase	Single Phase (230V AC ± 1%)
Backup	Minimum 60 minutes at full load
Batteries	Sealed Lead Acid (SMF) or Tubular (as per court preference)
Protection	Short circuit, Overload, Battery low/high, Lightning/Surge
Stand	Heavy-duty MS Powder Coated Battery Stand (Tiered)
Maintenance	02 Years Comprehensive On-site Warranty & Maintenance
Operation Temperature	**0°C to 40°C** (Ideal for Server Room environments)

2) Mouse Pad – (Reputed Branded)

3) Wired Keyboard and Mouse combo – (Reputed Branded)

K Gaikwad
Kamlesh V. Gaikwad
System officer.

20/11/2026
Addl. Registrar
Court of Small Causes
Bandra Branch
Mumbai 400 051.